महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचे आधुनिकीकरणांतर्गत बांधकाम, विस्तारीकरण, दर्जावाढ यासाठी निधी वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह (परिवहन) विभाग
शासन निर्णय क्र. एसटीसी- ०२१९/प्र.क्र. ४५ /परि-१,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ मार्च, २०१९.

वाचा : १) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय, क्र.बीयुडी-२०१८/प्र.क्र.१७/कार्या-६ दि.१८ मार्च, २०१९.
२) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे पत्र क्र.राप/स्थाअ/कामे/७१७, दि.०८.०२.२०१९.

शासन निर्णय :-

आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दि.१८.०३.२०१९ च्या शासन निर्णयान्वये सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी क्षेत्रातील राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचे आधुनिकीकरण या योजनेअंतर्गत मागणी क्र.टी-५, ३०५५, मार्ग परिवहन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ००-मार्ग परिवहन, ७९६-जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०१) आदिवासी क्षेत्रात एस.टी.डेपोचा विकास, बांधकाम, दुरुस्ती (३०५५ ००४३), ३१-सहायक अनुदाने या बाबीखाली गडचिरोली येथे चालक प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी रु.३२०.०० लाख (अक्षरी रुपये तीन कोटी वीस लाख फक्त) इतका निधी प्रशासकीय विभाग म्हणून प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान केली आहे.

२. वरीलप्रमाणे निधी वितरीत करण्यासाठी परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्या कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर रक्कम आहरित करुन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांना अदा करण्याची कार्यवाही करावी. सदर निधी खर्च करण्याबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक आचारसंहिता यांचे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

३. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१९०३२५१६४०२९५५२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by Meghana Gaurav Shinde
Date: 2019.03.25 16:44:25 +05'30'

(मेघना गौरव शिंदे)
कार्यासन अधिकारी, गृह (परिवहन) विभाग

प्रत, माहितीसाठी अग्रेषित :-

१) महालेखापाल, १ / २, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई/नागपूर.
२) महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षण), मुंबई.

३) आयुक्त परिवहन, परिवहन आयुक्त यांचे कार्यालय, बांद्रे, मुंबई.
४) उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवनह महामंडळ, मुंबई-८.
५) आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखा परिक्षण अधिकारी, मुंबई.
८) जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली.
९) वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई.
१०) आदिवासी विकास विभाग (कार्यासन-६), मंत्रालय, मुंबई-३२.
११) वित्त विभाग (व्यय-८/ साऊ/ अर्थसंकल्प-१०/ अर्थोपाय/ विनियम), मंत्रालय, मुंबई-३२.
१२) गृह (परिवहन) विभाग (बीयुडी-१/बीयुडी-२/परिवहन-४), मंत्रालय, मुंबई.
१३) निवड नस्ती, गृह विभाग (परिवहन-१), मंत्रालय, मुंबई.